# मुंबई पोलीस शिपाई / बॅन्डमन्स् भरती-२०१७

विषय:- दि. १७/०५/२०१७ रोजी होणा-या लेखी परीक्षेसाठी उमेदवारांकरीता महत्वाच्या सूचना्
संदर्भ:- १) मुंबई पोलीस भरती जाहीरात क्र.०१ दिनांक २५.०२.२०१७.
२) मैदानी चाचणी गुणवत्त यादी दि.०४.५.२०१७ च्या सूचना.

१)पोलीस शिपाई पदासाठीच्या उमेदवारांची लेखी परीक्षा मुंबई येथे दि. १७/०५/२०१७ रोजी सकाळी ११:०० वाजता व बॅन्डमन्स् पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांची लेखी परीक्षा त्याच दिवशी दुपारी ०२:०० वाजता घेण्यांत येईल.

२) महाऑनलाईन प्रा.लि.या कंपनी मार्फत प्रवेश पत्र (हॉल टिकीट) ऑन लाईन पध्दतीने डाऊनलोड करण्यांसाठी प्रसिध्द करण्यांत आलेली आहे व लेखी परिक्षेबाबत SMS सुध्दा उमेदवारांना पाठविण्यांत आलेले आहेत.

३) उमेदवाराने लेखी परीक्षेकरीताच्या प्रवेश पत्राची मुद्रीत प्रत डाऊनलोड करून प्राप्त करून घ्यावी व लेखी परिक्षेचे ठिकाण ,वेळ याची खात्री करावी.

४) प्रवेश पत्रावर उमेदवाराने स्वत:चा फोटो चिकटवून त्यावर (अर्धी प्रवेशपत्रावर व अर्धी बाहेर) स्वत:ची स्वाक्षरी करावी. तसेच सदरचे प्रवेशपत्र राजपत्रित अधिकारी अथवा स्थानिक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किंवा शाळा/कॉलेजचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांचेकडुन साक्षांकित करून घ्यावे व त्यावर संबधित अधिका-यांचा शिक्का असणे आवश्यक आहे.

५) मैदानी चाचणीचे प्रवेशपत्र व लेखी परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र ही दोन्ही प्रवेशपत्र असल्याशिवाय उमेदवारास परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

६) उमेदवाराकडे स्वत:चे फोटो आयडी (आधार कार्ड/पॅन कार्ड/निवडणूक ओळखपत्र/स्मार्ट कार्ड इत्यादी पैकी एक पुरावा) असल्याशिवाय परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

७) मैदानी परीक्षेचे प्रवेशपत्र हरविल्यास/फाटल्यास डुप्लीकेट प्रवेशपत्र दिले जाणार नाही व त्याशिवाय लेखी परीक्षेस परवानगी दिली जाणार नाही.

८) उमेदवाराने परीक्षा केंद्रावर सकाळी ठिक ०९:३० वाजता उपस्थित राहणे आवश्यक राहील – उमेदवाराने कमीत कमी १ तास अगोदर वर्गात स्थानापन्न होणे आवश्यक आहे.

९) लेखी परीक्षेचा कालावधी ९० मिनीटांचा आहे,लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची मराठीमध्ये असून एकुण १०० गुणांची आहे.

१०) उमेदवाराने परीक्षा केंद्रावर काळया शाईचे बॉलपेन व पॅड न विसरता सोबत आणावे.

११) उत्तरपत्रिका कार्बनलेस O.M.R. प्रकारची दोन प्रतिमध्ये असून दुय्यम प्रत उमेदवारास घेवून जाण्याची मुभा देण्यात आली आहे.

१२) प्रश्नपत्रिका/उत्तरपत्रिकेवर उमेदवाराने फक्त स्वत:चा अर्ज क्र. व छाती क्र.व प्रश्नपत्रिका संच सांकेतांक (A,B,C,D) इंग्रजीमध्ये लिहावयाचा असून व तो बरोबर असल्याची खात्री करावी. तसेच अन्य कोणतीही माहिति लिहु नये.

१३) उमेदवार  कॉपी किंवा अन्य गैरकृत्य करतांना आढळून आल्यास त्याला भरती प्रक्रियेमधून बाद ठरवून उमेदवारी रदद् करण्यात येईल व त्याचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

१४) परीक्षा केंद्रात  मोबाईल फोन/डिजिटल डायरी/कॅक्युलेटर/मायक्रोफोन/नोटपॅड/नोट्स/पुस्तके अथवा कोणतेही इलेक्ट्रॉनीक उपकरण ईत्यादी साहित्य परिक्षा केंद्रवार आणण्यास सक्त मनाई आहे. अशा प्रकारच्या वस्तु आढळल्यास उमेदवारांस त्याच क्षणी बाद ठरवून उमेदवारी रदद करण्यांत येईल. तसेच कसूरदाराविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यांत येईल.

१५) उमेदवाराने प्रश्नपत्रिकेवर प्रश्नांची उत्तरे अथवा कोणत्याही प्रकारचे लिखाण करू नये.

१६) लेखी परिक्षा झाल्यावर परिक्षेची नमुना उत्तरपत्रिका (Model Answer Sheet) प्रश्नपत्रिकेच्या संकेतांकानुसार **www.mumbaipolice.gov.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यांत येईल.

१७) उत्तरपत्रिकेची तपासणी संगणक प्रणालीव्दारे करण्यात येणार असल्याने, उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर खाडाखोड,कच्चे काम इत्यादी करू नये किंवा व्हाईटनरचा वापर करू नये. उत्तरे लिहतांना उत्तर पत्रिका फाटणार नाही/डाग पडणार नाही तसेच उत्तरपत्रिका चुरगळणार नाही याची उमेदवाराने विशेष काळजी घ्यावी. उत्तरपत्रिका खराब झाल्यास कोणत्याही परीस्थितीत बदलून मिळणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१८)  लेखी चाचणीचा निकाल लागल्यानंतर उमेदवारांना लेखी परीक्षेस प्राप्त गुणांसंदर्भात काही शंका/तक्रार असल्यास त्या संदर्भात ४८ तासांच्या आत उमेदवारांना मा.अध्यक्ष, लेखी परीक्षा समिती कार्यालय, वाहतूक पोलीस मुख्यालय, तक्रार निवारण कक्ष, १ला मजला, सर पोचखनवाला रोड, वरळी , मुंबई येथे यांच्या नावाने रु. २००/- फेरतपासणी शुल्कासह  समक्ष हजर राहून सादर करावे. ४८ तासानंतर येणा-या उमेदवारांच्या निवेदनाचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१९) उमेदवाराकडुन भरती निकषाच्या कोणत्याही अटी व शर्थीचे उल्लंघन झाल्यास अथवा गैरकृत्य केल्यास त्यांचा अर्ज रदद् करून त्यांना भरती प्रक्रियेमधून बाद /अपात्र ठरविण्यात येईल.

२०)  उमेदवाराने लेखी परीक्षेच्या प्रवेश पत्रावरील तसेच प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका यावर दिलेल्या सुचनांचे काळजीपूर्वक वाचन करून त्यांचे काटेकोरपणे पालन करावे.

**Sd/-**

( अश्विनी सानप—देवधर )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय—२
अध्यक्ष मुंबई पोलीस भरती समिती—२०१७
तथा सह पोलीस आयुक्त(प्रशासन)
बृहन्मुंबई यांचेकरिता